# राजे यशवंतराव होळकर महामेष योजना



## योजनेचे ठळक वैशिष्टे

- राज्यात मेंढी पालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी.
- योजना मुंबई व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यासाठी

## योजने अंतर्गत देण्यात येणारे लाभ

- स्थायी आणि स्थ्यलांतरित पद्धतीने मेंढीपालनासाठी पायाभूत सोई -सुविधेसाठी २०मेंढ्या +१ मेंढानर अशा मेंढी गटाचे ७५% अनुदानावर वाटप .
- सुधारित प्रजातीच्या नर मेंढ्यांचे ७५% अनुदानावर वाटप करणे.
- मेंढी पालनासाठी पायाभूत सोई -सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान .
- मेंढी पालनसाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान .
- हिरव्या चाऱ्याला मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper ) खरेदी करण्यासाठी ५०% अनुदान .
- पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५०% अनुदान .

## पात्रता

- सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असेल.
- लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.
- लाभधारकांची निवड करताना, महिलांकरिता ३०% व अपंगांकरिता ३% आरक्षण .
- या योजने अंतर्गत भटक्या जमाती (भज - क) प्रवर्गातील बचत गटांना / पशुपालक उत्पादक कंपन्याना
- लाभार्थी म्हणून प्राधान्य देण्यात येईल.
- ज्या लाभधारकांना या आधी महामेष योजनेअंतर्गत लाभ मिळालेला आहे अशा लाभधारकांना यामध्ये
- पुन्हा अर्ज करता येणार नाही.
- पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत गेल्या ३ वर्षामध्ये लाभ घेतलेल्या
- व्यक्तीस किंवा कुटुंबातील व्यक्तीस या योजनेअंतर्गत पुन्हा अर्ज करता येणार नाही.
- एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस अर्ज करता येईल.
- स्थायी पद्धतीने मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना शेड बांधण्याकरिता स्वत: ची जागा असणे
- आवश्यक आहे.
- अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या
- सेवेत किंवा सेवानिवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन /
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी/ लोकप्रतींनिधी नसावा.

## अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती

- अर्ज सादर करण्याचा कालावधी १५/११/२०२२ ते ३०/११/२०२२ पर्यंत
- योजनेची पूर्ण माहिती या अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती याबाबतचा संपूर्ण तपशील www.mahamesh.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे .
- ऑनलाईन पद्धतीने अर्ज महामंडळाच्या वरील संकेतस्थळावर तसेच Android Mobile मधील Google Play store वरून Mahamesh App व्दारे करण्यात यावे
- अधिक माहिती साठी संकेतस्थळ वर भेट घ्या www.mahamesh.co.in

## Helpline

- Phone Number- 020-25657112
- Email- mdsagpune@gmail.com